# बोर्ड प्रश्नपत्रिका : मार्च २०१७

**वेळ: ३ तास** **एकूण गुण: ४०**

**सूचना:**

i. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.

ii. उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवतात.

iii. आलेख कागदाचा वापर प्रश्न क्र. ३ (अ) साठी करावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडा.

iv. भारताचा नकाशा आराखड्याचा वापर प्रश्न क्र. ३ (क) साठी करावा व तो मुख्य उत्तरपत्रिकेस जोडा.

v. नकाशा काढण्यासाठी स्टेन्सिलचा वापर करण्यास परवानगी आहे.

---

१. **(अ) कंसात दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा व उत्तरपत्रिकेत पुन्हा लिहा :** [३]

१. क्षेत्रफळाच्या दृष्टीने भारत हा जगातील _______ क्रमांकाने मोठा देश आहे.

(पाचव्या, सहाव्या, सातव्या, चौथ्या)

२. वन मृदा _______ रंगाची असते.

(गडद पिवळ्या, गडद तपकिरी, गडद लाल, गुलाबी)

३. बागर प्रांताच्या आग्नेय भागातून _______ नदी वाहते.

(सतलज, घागरा, लुनी, सरस्वती)

**(ब) 'अ ' स्तंभातील घटकांशी 'ब' स्तंभातील घटकांबरोबर योग्य जोड्या लावा :** [३]

| | 'अ' स्तंभ | | 'ब' स्तंभ |
|---|---|---|---|
| १. | शिसव | अ. | थंड हवेचे ठिकाण |
| २. | गुरूशिखर | ब. | तीर्थक्षेत्र |
| ३. | सापुतारा | क. | अरवली पर्वत |
| | | ड. | शिवालिकच्या पायथ्याशी |

२. **(अ) भौगोलिक कारणे लिहा (कोणतेही दोन) :** [४]

१. भूगोलाच्या अभ्यासात प्रादेशिक दृष्टिकोन हा अत्यंत महत्त्वाचा असतो.

२. पूर्व घाटातील मृदा अधिक सुपीक नाही.

३. राजस्थानचे वाळवंट पर्यटकांना आकर्षित करते.

४. मध्यवर्ती उच्चभूमी पठारावरील वनांची संख्या घटत आहे.

**(ब) थोडक्यात टिपा लिहा (कोणतेही दोन) :** [४]

१. आसाम मैदानातील पर्यावरणीय समस्या

२. महाराष्ट्र पठार

३. भारतीय बेटावरील मासेमारी

३. **(अ) खाली दिलेल्या सांख्यिकीय माहितीच्या आधारे रेषालेख काढा :** **[२]**

| **वर्षे** | २०००-०१ | २००१-०२ | २००२-०३ | २००३-०४ | २००४-०५ |
|---|---|---|---|---|---|
| **साखर उत्पादन (लाख टन)** | ९५ | १३० | १८० | १६० | १२५ |

**(ब) खाली दिलेल्या आकृतीचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[२]**




**प्रश्न :**

१. दिलेली आकृती कोणत्या प्रकारची आहे?

२. भारतात सर्वाधिक कोणत्या वाहनांची विक्री होते?

३. भारतात सर्वांत कमी कोणत्या वाहनांची विक्री होते?

४. व्यापारी वाहनांची किती विक्री झाली?

**(क) तुम्हांस पुरवलेल्या भारताच्या नकाशा आराखड्यात पुढील घटक दाखवा व त्यांना नावे द्या. (सूची आवश्यक आहे) (कोणतेही दोन) :** **[२]**

१. पश्चिम किनारी मैदान    २. सिक्कीम हिमालय

३. जैसलमेर    ४. गोदावरी नदी

४. **पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा (कोणतेही दोन) :** **[८]**

१. हिमालयात उगम पावणाऱ्या नद्यांविषयी सविस्तर माहिती द्या.

२. गंगेच्या मैदानातील जंगलाचे वितरण लिहा.

३. पश्चिम घाट व किनारी मैदानी प्रदेशाच्या पर्यावरणीय समस्यांचे स्पष्टीकरण करा.

५. **रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून वाक्ये पूर्ण करा:** **[२]**

१. भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन साधनांचे स्वामित्व, नियंत्रण आणि व्यवस्थापन ________ केले जाते.

(सरकारद्वारे, समाजाद्वारे, खाजगी व्यक्तींद्वारे)

२. आर्थिक प्रश्न मुख्यत: साधनांच्या ________ निर्माण होतो.

(विपुलतेमुळे, दुर्मीळतेमुळे, उपलब्धतेमुळे)

**६. प्रत्येकी एक किंवा दोन वाक्यांत उत्तरे लिहा (कोणतेही तीन) : [६]**

१. राजकीय सार्वभौमत्व म्हणजे काय?

२. सार्वजनिक वितरण प्रणालीचा अर्थ स्पष्ट करा.

३. औद्योगिक कलहामुळे कोणते परिणाम होतात?

४. ग्राहकाची कर्तव्ये कोणती?

५. बँक दर म्हणजे काय?

**७. पुढील प्रश्नांची पाच किंवा सहा वाक्यांत उत्तरे लिहा (कोणताही एक) : [४]**

१. वस्तू आणि सेवांच्या मागणीत वाढ होण्यास कोणकोणते घटक कारणीभूत आहेत?

२. सार्वजनिक वितरण प्रणालीतील उणिवा दूर करण्यासाठी कोणते उपाय सुचवले आहेत?